# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Missing Property**

**Police Station** :- **Manora**

**Date of Good Work done** :- **14/02/2022**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन मानोरा हद्दीतील गुंडी येथील पोलीस पाटील अजबराव मनवर यांना रस्त्यावर पॉकेट मिळून आल्याने त्यांनी पोलिस स्टेशनला जमा केले त्यावरून पोलिसांनी पॉकिट चा मालक याचा शोध घेऊन रोख रक्कम व महत्त्वाचे कागदपत्रे हे परत देण्यात आली आहे यामुळे पोलिस पाटील यांचा प्रामाणिकपणा दिसून आला असून त्याबाबत त्यांचे सर्व स्तरावर कौतुक होत आहेत

## गुंडी येथील पोलीस पाटीलाने दिला माणुसकीचा परिचय

देशोन्नती वृत्तसंकलन...



**मानोरा** ▪ तालुक्यातील पोलीस पाटील यांची पोलीस स्टेशनला दि.१० फेब्रुवारी आयोजीत मिटिंगला येत असता रस्त्यावर पडलेले पाकीट आढळून आले. ते पाकीट पोलीस निरीक्षक सुनील जाधव यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. डोलारी येथील नागरिकांना बोलाऊन त्यांना देण्यात आले.गुंडी येथील पोलीस पाटीलानीं माणुसकीचा परिचय दिल्यामुळे त्यांचा सत्कार करण्यात आला.

येणारे सण, उत्सव संत सेवालाल महाराज, शिवजयंती निमित्त कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस स्टेशनला सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेला उपस्थित राहण्यासाठी गुंडी येथील पोलीस पाटील अजाबराव मनवर हे कारंजा मानोरा रस्त्याने येत असता त्यांना रस्त्यावर पाकीट पडलेले आढळले. सदर पाकीट हे डोलारी ता दारव्हा येथील नागरिकाचे होते. पोलीस पाटील संघटनेच्या ग्रुपच्या माध्यमातून डोलारी येथील पोलीस पाटील यांच्याकडून सदर इसमाचे मोबाईल नंबर घेण्यात आला दहा मिनिटात सदर व्यक्तीला फोन करून तुमचे पाकीट मानोरा पोलिस स्टेशन मध्ये जमा आहे, असे सांगण्यात आले तो इसम पोलीस स्टेशन मध्ये येऊन त्याला ते पाकीट देण्यात आले. त्यात महत्त्वाची कागदपत्रे व १७०० रुपये होते.त्यावेळी मानोरा पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुनिल जाधव यांच्या हस्ते सदर पाकीट त्या नागरिकाला देण्यात आले व चांगल्या कार्याबद्दल अजाबराव मनवर पोलीस पाटील गुंडी यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यांच्या प्रामाणिकतेचे कौतुक होत आहे.(शहर प्रतिनिधी )